# संतांचे साहित्य पर्यावरणाशी एकरूप


■ डॉ. वासुदेव सावंत


**संतांच्या साहित्यातील प्रतिमासृष्टी पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश अशा पंचमहाभूतांना व्यापणारी; सूर्य, चंद्र, तारे, नदी-निर्झर, वर्षादि सारे ऋतू, अश्वत्थासारख्या वृक्षापासून ते लव्हाळ्यासारख्या तृणापर्यंत सर्व वनस्पती; हत्ती-सिंहापासून ते मुंगी-मशकांपर्यंतचे सर्व पशुपक्षी अशा निसर्गातील घटकांनी व्यापून गेलेली आहे.**



पर्यावरण हा आज मानवी विचार विश्वातला- विशेषतः पाश्चात्त्य जगात चर्चेचा एक कळीचा मुद्दा बनलेला आहे. विज्ञानयुगात भांडवलशाही व्यवस्थेमुळे माणसानेच पर्यावरणाचे केलेले शोषण किती भयावह आहे, याची जाणीव गेल्या काहीवर्षांत फार तीव्रतेने झालेली आहे. म्हणूनच पर्यावरणाची अधिक हानी टाळून त्याचे रक्षण करणे आणि निसर्गाचा समतोल टिकवून ठेवणे, यादृष्टीने विविध अंगाने प्रयत्न होत आहेत. अनेक संस्था, चळवळी कार्यरत आहेत. पाश्चात्त्य देशात तर पर्यावरणवादी राजकीय पक्षही स्थापन झालेले आहेत. सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक शास्त्रांप्रमाणेच साहित्यक्षेत्रातही पार्यवरणाबद्दलची ही संवेदनशीलता "Eco- criticism'च्या रूपाने आविष्कृत झालेली आहे. 'असोसिएशन फॉर स्टडी ऑफ लिटरेचर ॲण्ड एन्व्हायरमेंट यासारख्या पर्यावरण आणि साहित्य यांचा अभ्यास करणाऱ्या संस्थाही अमेरिकेसारख्या देशात स्थापन झालेल्या आहेत. ज्या परिस्थितीमुळे पाश्चिमात्यांना पर्यावरणाचे भान एवढ्या तीव्रतेने झालेले आहे, ती पर्यावरणाची विध्वंसक स्थिती वस्तुतः पाश्चिमात्यांच्या जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामुळे आणि त्यांच्या जीवनपद्धतीमुळेच निर्माण झालेली आहे.

पाश्चिमात्त्यांची एकूणच जगाकडे पाहण्याची दृष्टी मानवाला सगळ्या सृष्टीचे केंद्रस्थान मानणारी आहे. माणसाभोवतालच्या सगळ्या

परिसंस्था, निसर्ग या गोष्टींना केवळ माणसाच्या जगण्याला उपयुक्त ठरणारी साधने म्हणूनच अस्तित्व आहे, अशी ही पाश्चात्त्य संस्कृतीची धारणा आहे. माणूस आपल्या बुद्धीच्या (Reason) साहाय्याने या निसर्गाची, सृष्टीची रहस्ये, नियम जाणून घेऊ शकतो व त्याआधारे नैसर्गिक संसाधनातून स्वतःला उपयुक्त अशा गोष्टी निर्माण करू शकतो. हा बुद्धिवाद ही युरोपातील प्रबोधनयुगाची देणगी आहे. या बुद्धिवादी विश्वासातून विज्ञानयुगाचा आणि विज्ञानाने लावलेल्या शोधातून औद्योगिक क्रांतीचा जन्म झालेला आहे.

आज हे औद्योगिक विश्व माणसाच्या जगण्याच्या केंद्रस्थानी आहे. माणसाच्या विकासाची संकल्पना उद्योगविकासाशी आज निगडित झालेली आहे. माणूस हा सतत विकसनशील आहे, ही धारणा तर पाश्चात्त्य आहेच, पण माणसाचा विकास म्हणजे काय, हेही आधुनिक काळात आम्ही पाश्चात्त्यांच्या संकल्पनेनुसारच ठरवलेले आहे. आज मानवी विकासाची आणि मानवी सुखाबद्दलची सगळी कल्पना माणसांच्या भौतिक समृद्धीभोवती केंद्रित झालेली आहे. माणसाला भौतिकदृष्ट्या समृद्ध करणारी नवी नवी असंख्य साधने उद्योगातून निर्माण होत आहेत, पण ही साधने निर्माण करण्यासाठी नैसर्गिक संसाधनेच कच्चा माल म्हणून वापरावी लागतात. माणसाची भौतिक सुखाची आणि उद्योग चालवणाऱ्यांची अधिकाधिक नफा मिळवण्याची हाव, नैसर्गिक साधनांच्या अमर्याद शोषणाला कारणीभूत ठरत असते. निसर्गाच्या या अमर्याद आणि अविवेकी शोषणामुळे पर्यावरणाचा कसा विध्वंस होत असतो, हे सगळ्या गोव्याला व्यापून राहिलेल्या खाण उद्योगाचे चित्र पाहणाऱ्या गोमंतकीयांना वेगळे सांगण्याची गरज नाही.

पर्यावरणाचा हा विध्वंस शेवटी मानवी अस्तित्वाच्याच मुळावर येणारा आहे. याची जाणीव या निसर्गाच्या शोषणाचा प्रारंभ ज्यांनी केला, त्या पाश्चिमात्त्यांना प्रथम व्हावी हे स्वाभाविकच म्हणावे लागेल. वर ज्या इको क्रिटिसिझम किंवा पर्यावरणवादी साहित्य समीक्षेचा उल्लेख केला, ती समीक्षा एखाद्या साहित्यकृतीतून पर्यावरणाबद्दल आणि विशेषतः त्याच्या विनाशाच्या प्रश्नाबद्दल लेखकाचे कोणते भान व्यक्त करते, या अनुरोधाने साहित्यकृतीचे विश्लेषण करणारी असते.

पर्यावरण-विनाशाच्या प्रश्नाला केंद्रवर्ती ठेवणारी ही समीक्षा मराठी संत साहित्याचा विचार करताना फारशी उपयोगी पडणारी नाही हे उघडच आहे. कारण ज्या आधुनिकपूर्व मध्ययुगीन काळात संतांचे साहित्य निर्माण झाले, त्याकाळात आजच्या अर्थाने पर्यावरणाचे, त्याच्या विध्वंसनाचे प्रश्न निर्माण होणे शक्यच नव्हते. पण संत प्रामुख्याने मानवाच्या अंतिम श्रेयसाचा अध्यात्म मार्गाने विचार करणारे जरी असले, तरी संत साहित्य वाचताना त्यातून संतांची मानवाभोवतालच्या सृष्टीकडे, निसर्गाकडे पाहण्याची एक दृष्टी व्यक्त झालेली आहे, असे निश्चितपणे जाणवते. निसर्गाकडे पाहण्याची संतांची ही दृष्टी खास भारतीय दृष्टी आहे. भारतीय संस्कृतीचा विश्वविषयक दृष्टिकोन (world view) त्यामागे आहे. म्हणून संतवाङ्मयाचा पर्यावरणवादी भूमिकेतून विचार करताना, आजच्या पर्यावरणवादी समीक्षेपेक्षा भारतीय संस्कृतीचा हा माणूस आणि त्याच्या भोवतालची सृष्टी, यांच्या संबंधांबद्दलचा दृष्टिकोन लक्षात घेणे अधिक आवश्यक ठरते.

वर उल्लेख केला त्याप्रमाणे पाश्चात्त्य संस्कृती माणसालाच साऱ्या सृष्टीचे केंद्र मानणारी, माणसाभोवतालची सारी सृष्टी, निसर्ग माणसाच्या उपयोगासाठी आहे, असे मानून माणूस आणि निसर्ग यात द्वैत मानणारी आहे. पण त्याउलट पारंपरिक भारतीय संस्कृती माणूस हा निसर्गाचाच एक भाग आहे, असे मानून माणूस आणि त्याच्या भोवतालची सृष्टी यात एकात्मता मानणारी आहे. माणसासहित सर्व चराचर सृष्टी एकाच चैतन्यतत्त्वाचा आविष्कार असल्याने 'हे विश्वचि माझे घर' ही भारतीयांची धारणा आहे. त्यामुळे भारतीय परंपरेत भूमी, वनस्पती, डोंगर, नद्या, पशू-पक्षी, कृमी-कीटक यांसारख्या सृष्टीतील असंख्य गोष्टींना माणसाहून वेगळे किंवा दुय्यम मानले जात नाही. म्हणून पंचतंत्रासारख्या कथासाहित्यातील कथा माणसाप्रमाणे वागणाऱ्या, बोलणाऱ्या पशू-पक्षांच्या कथा असतात, तर पुराणकथांमध्ये माणूस आणि निसर्ग मानवी नातेसंबंधाने बांधलेले असतात. उदा. पार्वती ही हिमालयाची कन्या असते, तर तुळसरूपी वृंदा कृष्णाची पत्नी असते. भारतीय दैवते आपले वाहन म्हणून छोट्याशा उंदरापासून ते हत्ती, सिंहासारख्या बलाढ्य प्राण्यांपर्यंत आणि घुबडापासून गरूडापर्यंत विविध पशू-पक्ष्यांना जवळ बाळगत असतात. या प्राण्यांप्रमाणेच विशिष्ट वृक्ष, वनस्पती फुले वेगवेगळ्या हिंदू देवतांशी निगडित मानलेली आहेत. (उदा. गणेश- दूर्वा आणि लाल रंगाचे फूल, लक्ष्मी व ब्रह्मदेव- कमळ, दत्तगुरू- औदुंबर वृक्ष, शंकर- बेल इ.) माणसालाच सृष्टीचे केंद्र न मानता माणूस आणि त्याच्या भोवतालची सृष्टी, पर्यावरण यामध्ये एकात्मता पाहण्याचा हा खास भारतीय दृष्टिकोन संतांचाही होता आणि संत साहित्यात पर्यावरण. निसर्गाचे चित्रण येते हे याच दृष्टिकोनातून.

आधुनिकपूर्व काळातली संतांची दृष्टी आधुनिक मानवाप्रमाणे केवळ भौतिक सुखालाच अंतिम श्रेयस मानणारी नव्हती. भौतिक गोष्टींना गरजेपुरतेच महत्त्व द्यावे. लोभ, मोह याऐवजी अपरिहार्य आणि असंग्रहवृत्ती अधिक महत्त्वाची, हा संतांचा दृष्टिकोन होता. आज पर्यावरणाच्या नाशाला माणसाची जी हव्यासी वृत्ती कारणीभूत ठरते आहे, त्या वृत्तीचा प्रसंगी निषेध करून संत तिला नियंत्रणात ठेवू इच्छितात. संतांची जगण्याविषयीची कल्पना अगदी साधी, त्यांच्या असंग्रवृत्तीची साक्ष देणारी आहे-

**सांई इतना देदे, जिसमें कुटुम समाय ।**
**मैं भी रहू न भूका, साधु न भूखा जाय ॥**

असं जगण्याच्या गरजेपुरतंच मागणारे संत कबीर किंवा

**कोण पाहे सुखा नासिवंताकडे!**
**तृष्णेचे बापुडे नव्हे**

आम्ही असं म्हणणारे संत तुकाराम माणसाच्या हव्यासी प्रवृत्तीचा निषेधच करतात. आज पर्यावरणाचे होणारे शोषण वाचवण्यासाठी संतांनी सांगितलेली भौतिक सुखाकडे पाहण्याची ही दृष्टीच अधिक उपयोगी ठरणारी आहे.

संत साहित्यातील पर्यावरणाचा विचार करताना संत ज्या सांस्कृतिक पर्यावरणात वावरत होते, ती संस्कृती कृषिप्रधान होती, हेही लक्षात ठेवले पाहिजे. संत एकनाथांसारखे पैठणसारख्या नगरात राहणारे संत वगळता बहुतांश संत अनागरी ग्रामीण भागातून आलेले होते. संत ज्या विविध जातींतून आलेले होते, त्या विविध जातीही गावगाड्यातील कृषीकेंद्रित समाजव्यवस्थेतून निर्माण झालेल्या होत्या. शेतकऱ्यांपासून ते कुंभारापर्यंत व नाभिकापासून ते सोनारापर्यंत असे कृषिप्रधान व्यवस्थेतून निर्माण झालेले व्यवसाय करणारे हे संत होते. कृषिप्रधान समाजात माणूस आणि

निसर्ग यांच्यातील एकात्मतेची भावना स्वाभाविकपणेच रुजलेली असते. भारतीय संस्कृतीच्या मुळाशी असणारी हीच भावना संतांच्या जीवनदृष्टीचा भाग होती. म्हणूनच संत प्रपंच, परमार्थ, भक्ती-अध्यात्म या विषयांवर प्रामुख्याने लिहीत असले, तरी हा आशय त्यांच्या साहित्यात माणसाभोवतालचा निसर्ग आणि पर्यावरण यांच्या सोबतीनेच व्यक्त झालेला आहे. आज ज्याला निसर्गकविता म्हटले जाते, तशी कविता लिहिण्याचा संतांचा उद्देश नव्हता. त्यामुळे प्रत्यक्ष निसर्गाचे वर्णन करणारी कविता संतांनी थोडीच लिहिलेली असली, तरी संतांच्या कवितेत निसर्ग व्यक्त झालेला आहे, तो प्रामुख्याने एखाद्या अनुभवाविषयी सांगताना त्यांनी वापरलेल्या उपमा-दृष्टांतातून आणि प्रतीक-प्रतिमानांतून. त्यातून संतांच्या दृष्टीत निसर्ग कसा एकरूप झालेला आहे हे कळून येते.

संत साहित्याचे प्रेरणास्रोत ठरलेल्या संत ज्ञानेश्वरांचे साहित्य ही पर्यावरण संवेदना व्यक्त करण्यातही अग्र आहे. त्यांनी केलेला गीतेचा भावानुवाद असो, अमृतानुभवासारखा तत्त्वग्रंथ असो, किंवा अभंगादि स्फूटरचना असो, ज्ञानदेवांचे निसर्गप्रेम या सर्व रचनांतून उत्स्फूर्तपणे व्यक्त झालेले दिसून येते. ज्ञानेश्वर उपमा-दृष्टांतासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांनी वापरलेल्या उपमा-दृष्टांतापैकी सुमारे ७५ टक्क्यांपेक्षा अधिक उपमा-दृष्टांत किंवा प्रतिमाने ही निसर्गसृष्टीशी संबंधित असल्याचे अभ्यासकांनी दाखवून दिलेले आहे. म. सु. पाटील यांच्यासारख्या चिकित्सक आधुनिक समीक्षकाला ज्ञानेश्वरांच्या साहित्यातील निसर्गावर स्वतंत्र लेख लिहावासा वाटतो. ज्ञानेश्वरीचा काव्यबंध या ग्रंथात पाटील लिहितात-

'सृष्टीतील कोणतेही घटक ते (ज्ञानेश्वर) जेव्हा मनात आणतात, तेव्हा ते प्रतिमांचे घटक म्हणून उपस्थित होतात. त्याचे कारण हा निसर्ग आणि सारे जग त्यांचा भला मोठा गर्भकोश बनलेला आहे. त्यातील कोणतीही गोष्ट त्यांना सुटी, वरवरची स्वेतर अशी वाटत नाही. नितळ पाण्यात वावरणाऱ्या मासोळीसारखे या सृष्टीत ते वावरत असतात.' (पृ. १०८)

ज्ञानेश्वर स्वतः पर्यावरणाचाच एक भाग होऊन लिहीत असतात, हे म. सु. पाटलांनी येथे जे लिहिलेले आहे, त्याचा साक्षात प्रत्यय आपणासारख्या वाचकाला ज्ञानदेवांची प्रतिमासृष्टी न्याहाळताना सहजपणे येतो. ज्ञानेश्वरीतील गुरूवंदन असो, कुंडलिनीजागृतीचे वर्णन किंवा स्थितप्रज्ञ प्रवृत्तीचे वर्णन, ज्ञाता-ज्ञेय संकल्पनांचे स्पष्टीकरण किंवा अमृतानुभवातील चिद्विलास तत्त्वज्ञानाची मांडणी असो, ज्ञानदेवांच्या प्रतिमा निसर्गसृष्टीत न्हालेल्या असतात. सद्‌गुरूकृपेचं वर्णन-

**अगा विश्वैकधामा तुझा प्रसादुचंद्रमा ।**
**करूं मज पौर्णिमा स्फूर्तीची जी ॥**

असे चंद्र आणि पौर्णिमा यांच्या प्रतिमांतून, तर स्थितप्रज्ञाची तटस्थ वृत्ती

**जी खांडावया घाव घाली लावणी जयाने केली ।**
**दोघा एकचि साउली वृक्ष दे जैसा ॥**

अशी वृक्षाच्या प्रतिकातून व्यक्त होते. ज्ञानदेवांच्या दृष्टीने ज्ञाता हा सूर्यबिंब, त्याची ज्ञानेंद्रिये सूर्यकिरण, तर ज्ञेय हे कमल असते. कुंडलिनी ही अधोमुख सर्पिणी, सोन्याची लगड आणि अग्निज्वालाची घडी, अशी अपूर्व तेजस्विनी असते. श्रोत्यांनी आपल्या कथनाचा आस्वाद कसा घ्यावा हे सांगताना ते म्हणतात-

**जैसे शारदियें चंद्रकळे माजि अमृतकण कोवळे ।**
**ते वेंचिती मनें मोआले चकोरतलगे ॥**
**अमर परागु नेति कमळदले नेला नेणती ।**
**तैसी आहे सेवति परी इये ग्रंथी ॥**

श्रोत्यांनी चकोर आणि भ्रमराप्रमाणे हळुवार आस्वाद घेतला तर, 'सर्व सुखासी पत्र घेईजे । हे प्रतिज्ञोत्तर माझे उघड आईका' असे ठाम विश्वासाने ते सांगतात. ब्रह्म, सत्य आणि जगन्मिथ्या हे अद्वैतवादी तत्त्वज्ञान नाकारून वारकरी पंथाला पायाभूत ठरणारे विश्व हा चैतन्याचा विलास आहे, असे सांगणारे चिद्विलासवादी तत्त्वज्ञान स्पष्ट करताना अमृतानुभवामध्ये ज्ञानदेव समुद्र आणि त्याच्या लाटा, किंवा सोने आणि त्यापासून केलेले दागिने, अशा प्रतिमा मांडतात. ज्ञानेश्वरांच्या आणि अन्य संतांच्या साहित्यातील प्रतिमासृष्टी पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश अशा पंचमहाभूतांना व्यापणारी, सूर्य, चंद्र, तारे, नदी-निर्झर, वर्षादि सारे ऋतू, अश्वत्थासारख्या वृक्षापासून ते लव्हाळ्यासारख्या तृणापर्यंत सर्व वनस्पती, हत्ती-सिंहापासून ते मुंगी-मशकांपर्यंतचे सर्व पशुपक्षी अशा निसर्गातील घटकांनी व्यापून गेलेली आहे. यात चकोर-चांदणे, चातक, हंस, कमळ यासारखी केवळ सांकेतिक प्रतिमानेच आहेत असे नाही, तर संतांच्या रोजच्या जगण्यातून, त्यांच्या भोवतालच्या निरीक्षणातून आलेल्या परिचित वस्तूंचीही आहेत. एकीकडे योगदुर्गाचे भव्य रूपक उभे करणारे ज्ञानदेव दुसरीकडे ग्रामीण भागात कालपरवापर्यंत रूढ असणाऱ्या एका लोकसमजाचीही पुढील ओवीत अचूक नोंद घेतात-

**पै हिंवराची दाट साउली । सज्जने जैसी वोळिली**

हिवराच्या झाडाच्या सावलीत माणसाने बसू नये, अशी एक समजूत आहे. कारण या झाडाच्या सालीचा उपयोग दारू गाळण्यासाठी आंबवण म्हणून केला जात आहे. त्यामुळे हिवराचे झाड लोकमानसात निषिद्ध ठरलेले आहे. तत्त्वज्ञान-अध्यात्माच्या क्षेत्रात लोकोत्तर पातळीवर असणाऱ्या ज्ञानदेवांसारख्या संताला हिवराच्या झाडाविषयी एवढे सूक्ष्म ज्ञान होते, हे बघून आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. पण माझ्या मते आश्चर्य वाटण्याचेही कारण नाही, कारण संत कृषिप्रधान किंवा ग्रामीण संस्कृतीत वाढलेले असल्याने, अशा लोकसमजुती त्यांना अपरिचित नसणार.

संत सावता माळी हे मळा फुलवण्याचा व्यवसाय करणारे, तर संत तुकाराम 'बरे देवा कुणबी केलो । नाही तरी दंभे असतो मेलो' असे स्वतःला अभिमानाने कुणबी म्हणवून घेणारे होते. ज्ञानेश्वर जातीने असे शेतकरी नव्हते, उलट जातिबहिष्कृत होते, पण त्यांच्या साहित्यात आलेले शेतीविषयक संदर्भ पाहिल्यावर ते खऱ्या अर्थाने कृषीसंस्कृतीतच कसे वाढलेले होते याची खात्री पटते. ज्ञानदेवांच्या साहित्यातील या शेतीविषयक संदर्भांची अत्यंत तपशीलवार नोंद गजानन खोले यांनी 'ज्ञानदेवांचे पर्यावरण' या बृहत्ग्रंथात घेतलेली आहे. शेतातील विविध पिके, फळे, फुले; शेतासाठी लागणारी खुरपे, कोयता, नांगर, कुऱ्हाड इ. हत्यारे यांच्या नोंदी जशा ज्ञानदेवांच्या साहित्यात येतात, त्याचप्रमाणे बी कोणत्या जमिनीत पेरावे, शेतीला मशागत करणे, कसे आवश्यक असते, हे सांगतानाच 'हे वाहे तया फावे' असे म्हणून कसेल त्याची जमीन, हे सूत्रही ते सांगून जातात. लहरी हवामानामुळे आणि योग्य कष्ट न केल्याने शेती फायद्याची न ठरता

शेतकऱ्याला कर्जबाजारी व्हावे लागते.

**कुळवाडी रिणे दाटली । वाकडिया ढोरे बैसली**

**ही** आज विशेषत्वाने प्रत्ययाला येणारी शेतकऱ्याची कर्जबाजारी अवस्थाही ज्ञानदेवांनी वर्णिलेली आहे. सावता माळ्यांसारखे शेतकरी संत आपल्या जीवनाचे अंतिम श्रेयस शेतमळा पिकविण्यातच पाहत होते.

**कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी ।**

**लसूण मिरची कोथंबिरी अवघा झाला माझा हरी ॥**

अशाप्रकारे शेत आणि शेतातील पिके हाच सावता माळ्यांच्या दृष्टीने विठ्ठल असल्याने, पंढरपूरच्या जवळ गाव असूनही शेत कसण्याचे काम सोडून पंढरीच्या वारीला न जाता शेतातच ते राबत राहत. ज्ञानेश्वर-नामदेवादि संतांना पंढरपुरातून गुप्त झालेला विठ्ठल सावता माळ्याच्या मळ्यात दिसला. भोवतालच्या सृष्टीतच विठ्ठल पाहण्याची ही दृष्टी जशी पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे, त्याचप्रमाणे 'कर्मे ईशु भजावा' या कर्मयोगाचेही सावता माळी हे ज्वलंत उदाहरण आहे.

संत तुकाराम हे स्वतःला अभिमानाने कुणबी म्हणवून घेणारे असल्याने शेतीसंबंधी सर्वाधिक प्रतिमाने तुकारामांच्या अभंगात येतात. चंदन, कमल इ. सांकेतिक प्रतिमानांपेक्षा शेतकऱ्याचे नेहमीचे पर्यावरण तुकारामांच्या प्रतिमासृष्टीत सातत्याने अवतरलेले आहे. चातक, चकोर यांच्याबरोबर कोंबडा, कावळा, घुबड, बगळा, माशी, गोमाशी, गांधीलमाशी, अळी यासारखे पक्षी-कीटक; गाय, बैल, घोडा, मेंढी, बोकड, ओटाळ ढोर, कुत्रे, उंदीर, मांजर, ढेकून असे प्राणी; कांदा, लसूण, कारले, भोपळा, फणस, नारळ, सेंदाळ कडू वृंदावन इ. भाज्या-फळे अशी सगळी कृषीकेंद्रित प्रतिमाने तुकारामांच्या साहित्यात सर्वत्र पसरलेली आहेत. तुकारामांचे या सृष्टीचे निरीक्षणही फार सूक्ष्म आहे. कुत्र्याची प्रतिमा वापरताना कुत्र्याचे पिसाळलेपण, त्याच्या शेपटीचे वाकडेपण, खादाडपणा, सतत भुंकण्याची सवय, दारोदार भटकण्याची सवय, लोकांनी त्याला हाड हाड करणे, या साऱ्या गोष्टी प्रतिमेचा भाग होतात. 'काय दिनकरा कोंबड्याने केला खरा' असं लिहिताना तुकाराम सूर्योदयाविषयीच्या लोकसमजुतीचीही नोंद घेतात. 'आवा चालली पंढरपुरा। वेशीपासून आली घरा' या त्यांच्या अभंगात शेतकऱ्याच्या घरसंसाराचे रेखाटलेले चित्रही तुकारामांच्या निरीक्षणशक्तीची साक्ष देणारे आहे. वृत्तीने असे शेतकरी असल्याने तुकारामांनी एका अभंगात वाघाच्या भुकेसाठी गाय मारणे जसे अयोग्य, तसे ईश्वरनिर्मित सृष्टीतही ढवळाढवळ करणे अयोग्य, असे सांगितलेले आहे. स्वतःच्या फायद्यासाठी सृष्टीत ढवळाढवळ करणाऱ्या आजच्या माणसाला तुकारामांचा हा विचार लाखमोलाचा सल्ला देणारा आहे. म्हणून पर्यावरणवादी समीक्षेला त्याची आवर्जून नोंद घ्यावी लागेल. संत ज्ञानेश्वरही-

**जळाशये निर्मावी । महावने लावावी नानाविधे**

असे सांगून पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देतात.

निसर्गाशी एकात्मभाव संतांच्या मनात रूजलेला असल्याने भूतदया संतांच्या उक्तीतून आणि कृतीतूनही दिसते. त्यामुळे संत नामदेव स्वतःचे जेवण कुत्र्याला देण्यासाठी त्याच्या मागे धावतात. संत एकनाथ काशीवरून खांद्यावर आणलेली गंगेची कावड रामेश्वराला पोचवण्याऐवजी तहानेने व्याकूळ झालेल्या गाढवाच्या मुखात ओततात. संत तुकारामांनी सांसारिकांना उपदेश करताना, उत्तम व्यवहाराने धन जोडून उदारवृत्तीने खर्च करण्याबरोबरच 'भूतदया गाईपशूंचे पालन तान्हेल्या जीवन वनामाजी' या गोष्टी सांभाळल्यास माणसाला उत्तम गती प्राप्त होईल, असेही सांगितलेले आहे. भूतमात्रांविषयी दया हेच संतांचे भांडवल आहे, असे तुकाराम म्हणतात.

अध्यात्म साधनेसाठी संसार सोडून वनात जाण्याची गरज नाही, असे संत मानत असले तरी एकांतात आत्मचिंतन करण्यासाठी संतांना निसर्गाचा सहवास प्रिय होता. कोणत्याही सिद्ध पुरुषाला किंवा योग्याला एका एकांतस्थळी जाणे आवश्यक वाटते. म्हणूनच संत तुकाराम देहूजवळच्या भंडाऱ्या डोंगरावर जात असत. त्यांचं निसर्गप्रेम व्यक्त करणारा पुढील अभंग प्रसिद्धच आहे-

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ॥**

**येणे सुखे रूचे एकांताचा वास । नाही गुणदोष अंगा येत ॥**

**आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथे मन क्रीडा करी ॥**

**तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुलाचि वाद आपणासि ॥**

संत ज्ञानेश्वरांनी योगी पुरुषाला योगसाधनेसाठी कशी निर्मळ व मन प्रसन्न करणारी सुंदर जागा असावी, याचे चित्र सहाव्या अध्यायात रेखाटलेले आहे. गीतेच्या मूळ श्लोकातील 'शुचौ देशे' या केवळ दोन शब्दांचे स्पष्टीकरण अनेक ओव्यांतून करताना सदा फळणारी दाट झाडे, पावलोपावली उदके, खळाळणारे निर्झर, वाऱ्याच्या मंद झुळुका, हंस-सारसांबरोबरच सौम्य आवाज करणारे शुक, मयूर, कोकीळ यांसारखे पक्षी... इत्यादींनी नटलेल्या निसर्गस्थळाचे फार रमणीय चित्र ते उभे करतात. संत रामदास तर भारतातील नाना स्थळी भ्रमंती करून शिवथर घळीच्या आश्रयाला आलेले. 'दास डोंगरी रहातो', असं स्वतःबद्दल सांगून 'सुखालागि आरण्य सेवित जावे' असे म्हणणारे. त्यांच्या साहित्यात निसर्गाची सुंदर चित्रे रेखाटलेली आहेत. त्यांची निसर्गवर्णनात्मक पुढील रचना लक्षवेधक आहे-

**गिरीचे मस्तकी गंगा तेथूनी चालली बळे ।**

**धबाबा लोटल्या धारा धबाबा तोय आदळे**

**गर्जतो मेघ तो सिंधू ध्वनि कल्लोळ उठिला ।**

**कड्यासी आदळे वारा वात आवर्त होतसे**

**दराच तुटला मोठा झाडखंडे परोपरी ।**

**निबिड दाटली छाया त्यामध्ये वोघ वाहती**

**तुषार उठले रेणू दुसरे रज मातले ।**

**वातमिश्रित ते रेणू सीतमिश्रीत धुकटे**

ही रचना रामदासांच्या निसर्ग निरीक्षणाची आणि त्यांच्या निसर्गप्रेमाची फार सुंदर साक्ष आहे.

संत साहित्यातील पर्यावरणाचा विचार येथे काही निवडक उदाहरणांच्या आधारे केलेला असला, तरी पुरेसा नाही याची जाणीव आहे. अनेक संतांच्या साहित्याचा विस्तारभयास्तव येथे नामोल्लेखही करता आलेला नाही. वर दिलेल्या मोजक्याच उदाहरणांतून भोवतालचा पर्यावरण सचेतन आहे, असे समजून आपण त्याचाच एक भाग आहोत, असे मानण्याची संतांची जी सहानुभावाची दृष्टी दिसते, ती आजच्या पर्यावरण ऱ्हासाच्या काळात मानवजातीलाच खूप काही शिकवणारी आहे, असे निश्चितच म्हणता येईल.

●●●